पोलीस अधिक्षक कार्यालय,लातूर
वाहतुक नियंत्रण शाखा,लातूर
दुरध्वनी क्र.०२३८२-२४८२००ई-मेल-trafficbranchlatur405@gmail.com

जा.क्र./वानिशा/वाहतुक कोंडी/उपाययोजना/जाहिरनामा/।३५/२०२६/लातूर          दिनांक १५/०४/२०२६

# :: जाहिरनामा ::

लातुर शहरात मागील कांही वर्षात लातूर शहरात दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे. तसेच लातूर शहर हे शैक्षणिक शहर म्हणून ओळखले जात असून, संपुर्ण महाराष्ट्रातून विद्यार्थी व विद्यार्थीनी कॉलेज व शिकवणी क्लासेससाठी लाखोंचे संख्येने येत असतात. तसेच लातूर शहर जिल्हयाची व परिसरातील प्रसिध्द मुख्य बाजारपेठ असून जिल्ह्यातून व परजिल्हातून व्यापारासाठी व खरेदीसाठी लोक मोठ्या प्रमाणात ये-जा करत असतात. मागील काळाचे तुलनेत लातूर शहराच्या शहरीकरणात व लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, त्याच बरोबर वाहनाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने रहदारी प्रचंड प्रमाणात वाढत आहे. परंतू शहरातील रस्ते हे जे पुर्वीचे होते तेच असुन अरुंद व छोटे आहेत. त्यामुळे परिणामी लातूर शहरात वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होवून अपघाताचे प्रमाण वाढल्याने त्यावर उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. शहरामध्ये दुचाकी व चारचाकी, अवजड वाहने यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने गंभीर व प्राणांतिक अपघात, वाहतुक कोंडी होवून कायदा व सुव्यव्यस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे याचे प्रमाण वाढल्यामुळे यावर उपाययोजना करणे बाबत रस्ता सुरक्षा समिती बैठकीत ठरले आहे.

त्याअर्थी लातूर शहरातील वाहतुक कोंडी कमी करणे व वाहतुक नियमनाचे अनुशंगाने शहरातील १) व्यापारी असोशियशन, लातूर, २) मालवाहतुक संघटना, लातूर, ३) ट्रान्सपोर्ट रोडलाईन्स असोशियशन, लातूर, ४) ट्रॅव्हल्स असोशियशन, लातूर, ५) काळी-पिवळी टॅक्सी संघटना, ६) ॲटोरिक्षा संघटना, ७) मंगल कार्यालय मालक/चालक संघटना, ८) जेष्ट नागरीक, ९) सामाजिक संघटना व कार्यकर्ते, १०) ट्राफीक ॲम्बेसिडर तसेच प्रादेशीक परिवहन कार्यालय, लातूर येथील प्रतिनिधी, मनपा, लातूर येथील प्रतिनिधी, राज्य परिवहन महामंडळ चे प्रतिनिधी यांच्या बैठका घेवून वाहतुक कोंडी विषयी उपाययोजनेवर उपविभागीय पोलीस अधिकारी लातुर शहर व पोलीस निरीक्षक, शहर वाहतुक शाखा, लातूर यांनी चर्चा करून त्यांच्याकडून सुचना घेण्यात आलेल्या आहेत.

त्याअर्थी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ पोटकलम १ (ब) अन्वये रहदारी विनीयम अधिकार अन्वये लातूर महानगरपालिका हद्यीतील एकेरी वाहतुक, पार्किंग, नो-पार्किंग, वाहतुकीचे मार्ग बंद करणे/वळवणे/लातूर शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणे संबधी आराखडयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**१)लातूर शहरातील सिग्नल व्यवस्था पुर्वी बसविण्यात आलेले :-**

| अ.क्र. | सिग्नलचे ठिकाण | सद्य स्थिती |
|---|---|---|
| १ | हनुमान चौक | आवश्यकते नुसार वापरात आहे. |
| २ | गूळ मार्केट | वापरात आहे. |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ३ | मिनी मार्केट | वापरात आहे. |
| ४ | अशोक हॉटेल | वापरात आहे. |
| ५ | छत्रपती शिवाजी महाराज चौक | आवश्यकते नुसार वापरात आहे. |
| ६ | खर्डेकर स्टॉप | वापरात नाही. (येलो ब्लिंकींग चालु आहे) |
| ७ | आदर्श कॉलनी | वापरात नाही. (येलो ब्लिंकींग चालु आहे) |
| ८ | जुना रेणापूर नाका | वापरात आहे. |
| ९ | नवीन रेणापूर नाका | वापरात आहे. |
| १० | दयानंद गेट | वापरात आहे. |
| ११ | संविधान चौक | वापरात आहे. |
| १२ | पीव्हीआर चौक | वापरात आहे. |
| १३ | राजीव गांधी चौक | वापरात नाही. |
| १४ | सिग्नल कॅम्प | बंद स्थितीत आहे. |
| १५ | सुभाष चौक | बंद स्थितीत आहे. |
| १६ | महात्मा गांधी चौक | बंद स्थितीत आहे. |
| १७ | शाहु चौक | बंद स्थितीत आहे. |
| १८ | विवेकानंद चौक | बंद स्थितीत आहे. |

तसेच लातूर शहराच्या शहरीकरणात वाढ झाल्यामुळे शहरातील रिंग रोड हे पुर्णतः शहरात आले आहेत. त्यामुळे तेथे वारंवार वाहतुक कोंडी व अपघात होत आहेत, यामुळे खालील ठिकाणी नविन सिग्नल व्यवस्था बसविण्यात येणार आहेत.

लातूर शहरात प्रस्तावित नविन सिग्नलची व्यवस्था बसविण्यात येणारे ठिकाणे :-

| **अ.क्र** | **आवश्यक नविन सिग्नलचे ठिकाणे** |
|---|---|
| ०१ | छत्रपती चौक (वाडा हॉटेलवळ) |
| ०२ | नाईक चौक |
| ०३ | कन्हेरी चौक |
| ०४ | महात्मा बस्वेश्वर चौक |
| ०५ | बाभळगाव नाका |
| ०६ | गरुड चौक |

**२) नो पार्किंग झोन घोषीत केलेली ठिकाणे :-**

खालील चौकामध्ये चारही मार्गावर चौकापासून ५० मिटर नो पार्किंग व नो स्टॉपिंग झोन

| **अ.क्र.** | **नो पार्किंग चौकाची ठिकाणे** |
|---|---|
| १ | हनुमान चौक |
| २ | गुळ मार्केट |
| ३ | मिनी मार्केट |
| ४ | अशोक हॉटेल |
| ५ | छत्रपती शिवाजी महाराज चौक |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ६ | खर्डेकर स्टॉप |
| ७ | आदर्श कॉलनी |
| ८ | जुना रेणापूर नाका |
| ९ | नवीन रेणापूर नाका |
| १० | दयानंद गेट |
| ११ | संविधान चौक |
| १२ | पीव्हीआर चौक |
| १३ | राजीव गांधी चौक |
| १४ | सिग्नल कॅम्प |
| १५ | सुभाष चौक |
| १६ | महात्मा गांधी चौक |
| १७ | शाहु चौक |
| १८ | विवेकानंद चौक |

**३) ट्रक टर्मीनल :-**

लातूर शहरातइतर राज्यातुन व परजिल्हयातुन मालवाहतुक करणारे जड वाहणे ट्रक, लॉरी, कंटेनर इ.वाहनांना शहरामध्ये आल्यानंतर गाडीमधील माल खाली करणे किंवा भरणेसाठी शहरात थांबण्यासाठी जागा निश्चित होणे आवश्यक असल्याने त्याकरीता गरुड चौक व एमआयडीसी येथील आवश्यक असणारी जागा मनपा कडून पाहणी करुन ट्रक टर्मीनल निश्चित करण्यात येवुन त्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमीत करण्यात येणार आहेत.

**४) पार्किंग झोन : -**

१) अण्णाभाऊ साठे चौकातील उत्तरेकडील मनपाची मोकळी जागा गंजगोलाई येथील खरेदी करण्यास येणारे ग्राहक व व्यापाऱ्यांसाठी चारचाकी, दुचाकी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था केलेली आहे.

२) जुने गुळमार्केट परिसरातील जुनी रेल्वे लाईनची मोकळी जागा बाहेर गावावरुन मार्केट यार्ड व किराणा खरेदी करण्यास येथे येणार ग्राहक व व्यापाऱ्यांसाठी चारचाकी, दुचाकी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था केलेली आहे.

३) गांधी मार्केट येथील पुर्व बाजूस मनपाकडून पार्किंगसाठी दिलेली जागा असुन तेथे चारचाकी व दुचाकी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था केलेली आहे.

४) छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ब्रीज हॉटेलसमोर, उड्डाणपुलाखाली दुचाकी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था केलेली आहे.

५) वरील पार्कींग ठिकाणा व्यतिरीक्त मनपा कडून पार्कीगसाठी इतर ठिकाणांची पाहणी करून अधिकची ठिकाणे पार्कींग झोन म्हणुन उपलब्ध होणेची कार्यवाही चालु आहे.

तसेच वरील निश्चिती करण्यात आलेल्या व नव्याने निश्चित करावयाच्या पार्कींग झोन ठिकाणी स्वच्छता, पार्कींग, लाईट व्यवस्था व इतर आवश्यक त्या उपाय योजना महानगरपालिका मार्फत करण्यात येणार आहे.

Scanned with OKEN Scanner

५) **नविन पी १ व पी २ पार्किंग झोन : -**

१) हनुमान चौक ते गंजगोलाई
२) सुभाष चौक ते गंजगोलाई
३) हनुमान चौक ते जुने गुळमार्केट (चारचाकी वाहनांसाठी)
४) गंजगोलाई ते हत्ते कॉर्नर (मस्जिद रोड)
५) हनुमान चौक - सुभाष चौक ते हत्ते कॉर्नर (चारचाकी वाहनांसाठी)
६) शाहु कॉलेजसमोरील काकुशेठ उक्का मार्ग
७) शिवनेरी हॉटेल-रमा चित्रमंदीर-बसवेश्वर महाविद्यालय मार्ग (खोरे गल्ली)
८) महात्मा गांधी चौक ते औसा हनुमान
९) पोस्ट ऑफीस-भालचंद्र ब्लड बँक-भक्ती मोबाईल
१०) जुने गुळ मार्केट-शिवनेरी गेट-जिंदाल टॉवर ते महात्मा बसवेश्वर चौक
११) गवळी चौक ते केशवराज शाळा
१२) दयानंद गेट-वाले इंग्लीश स्कुल ते स्वागत मंगल कार्यालय
१३) संविधान चौक-सरस्वती विद्यालय ते स्वागत मंगल कार्यालय (प्रकाश नगर रोड)
१४) जुना रेणापुर नाका - बसस्थानक क्रमांक २ ते बालाजी मंदीर
१५) साठफुटी कॉर्नर/साळे गल्ली-एम.के.फंक्शन हॉल-डॉ.अब्दुल कलाम चौक-सिध्देश्वर मंदीर ते मळवटीचौक

६) **सायलेन्स झोन :-**

१) तहसिल कार्यालय ते मा.जिल्हा सत्र न्यायालय समोरील मेन रोड दोन्ही बाजू
२) जुने जिल्हाधिकारी कार्यालय समोरील रोड
३) मा.जिल्हाधिकारी निवासस्थान ते नविन जिल्हाधिकारी कार्यालय बार्शी रोड
४) महात्मा गांधी चौक ते मिनी मार्केट (शासकिय रुग्णालय, महाविद्यालय परिसर)
५) पुरणमल लाहोटी शासकिय तंत्रनिकेतन कॉलेजसमोरील औसा रोड दोन्ही बाजु
६) शासकिय विश्रामगृह व सार्वजनिक बांधकाम विभाग परिसर
७) राजस्थान शाळा ते विवेकानंद हॉस्पिटल परिसर

७) **एकेरी मार्ग :-**

१) महात्मा गांधी चौक - मध्यवर्ती बसस्थानक - हनुमान चौक ते गंजगोलाई
२) हनुमान चौक ते जुने गुळमार्केट
३) बसस्थानककडून शाहु कॉलेजसमोरुन काकुशेठ उक्का मार्ग जुने बसस्थानक जाणारा
४) गंजगोलाई ते जुने गुळमार्केट (सराफा लाईन)
५) जुने गुळमार्केट ते महात्मा गांधी चौक
६) गंजगोलाई ते सुभाष चौक
७) छत्रपती शिवाजी महाराज चौक ते दयानंद गेट जाणारा स्व.विलासराव देशमुख (पॅरलल)मार्ग

Scanned with OKEN Scanner

८) अवजड वाहनांना प्रमुख मार्गावर बंदी :-

लातूर शहराच्या मध्य भागात मालवाहतुक करणारी अवजड वाहने यांना खालील मार्गावर सकाळी ०७.०० ते रात्री २२.०० बाजे पावेतो प्रवेश मनाई करुन बंदी करण्यात आलेले मार्ग खालीलप्रमाणे :-

**मार्ग क्र -** १) शिवाजी चौक ते गांधी चौक
२) गांधी चौक ते गंजगोलाई
३) गंजगोलाई ते शाहु चौक
४) शाहु चौक ते सम्राट चौक
५) गुळमार्केट ते महात्मा गांधी चौक
६) गुळमार्केट ते सम्राट चौक
७) शिवनेरी हॉटेल ते मुख्य पोस्ट ऑफिस
८) बस्वेश्वर कॉलेज ते पोष्ट ऑफिस, ब्लड बँक
९) हनुमान चौक सुभाष चौक ते हत्ते कॉर्नर,
१०) हत्ते कॉर्नर ते गंजगोलाई
११) गंजगोलाई ते सुभाष चौक
१२) गंजगोलाई ते शाहु चौक
१३) गोलाई ते आजुबाजुचे रोडचा परिसर

**अवजड वाहनांना प्रमुख मार्गावर बंदी करण्यात आलेले नवीन मार्ग :-**

**मार्ग क्र.** १) राजीव गांधी चौक ते छ.शिवाजी महाराज चौक
२) पीव्हीआर चौक ते छ.शिवाजी महाराज चौक
३) नविन रेणापूर नाका ते छ.शिवाजी महाराज चौक
४) स्वामी विवेकानंद चौक ते शाहु चौक
५) स्क्रॅप मार्केट चौक ते माने टायर्स (स्क्रॅप मार्केट रोड)
६) सिध्देश्वर मंदीर चौक ते मिरकले पान कॉर्नर (६० फुट रोड)
७) मिनी मार्केट ते कन्हेरी चौक
८) गुळ मार्केट ते कोरे गार्डन कॉर्नर
९) स्व.विलासराव देशमुख मार्ग (पॅरलल रोड)

९) **खाजगी ट्रॅव्हल्सचा शहराबाहेर थांबा :-**

खाजगी बस वाहतुक (ट्रॅव्हल्स) यांना शहरात सकाळी ०९.०० ते रात्री २१.०० वाजेपर्यंत प्रवेश बंद राहील. शहरातील जुने रेल्वे स्टेशन, गांधी चौक परिसरात, अशोक हॉटेल, देशिकेंद्र उड्डाणपुलावर, उद्योग भवन, दयानंद गेट, पाण्याची टाकी, पीव्हीआर चौक, जिल्हा क्रिडा संकुल, आदर्श कॉलनी ई ठिकाणी रोडवर थांबा करुन प्रवाशी घेत असतात त्यामुळे वाहतुक कोंडी होते ती टाळण्याच्या दृष्टीकोनातुन उपाययोजनेचा भाग म्हणुन बाहेरुन शहरात येणाऱ्या व शहरातुन बाहेर जाणाऱ्या सर्व खाजगी ट्रॅव्हल्स यांना रिंग रोडलगत थांबा देण्यात यावा.औसा रोडवरील राजीव गांधी चौकाजवळील बिडवे यांची खुली जागा आहे. याबाबत सदर जागेची पाहणी वाहतुक

Scanned with OKEN Scanner

नियंत्रण शाखा, राष्ट्रीय महामार्ग व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यांचे अधिकारी यांनी संयुक्तरित्या केली आहे. त्याबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर येथे बैठका झाल्या असुन लातूर ट्रॅव्हल्स असोशिएशन व जागा मालक श्री बिडवे यांचे सोबत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. त्याबाबत सुधारीत आदेश निर्गमीत करण्यात येतील.

१०) लातूर शहरात येणाऱ्या काळी-पिवळी, टॅक्सी व सहा आसनी मिनीडोअर यांची जुने थांब्यात बदल होवून खालील नविन थांबे निश्चित करण्यात आले आहेत.

| अ. क्र. | मार्ग | निश्चित करावयाचे थांबे | |
|---|---|---|---|
| | | **प्रवाशी घेणे** | **प्रवाशी उतरवणे** |
| १ | औसा रोडवरुन लातूर कडे येणारी काळी-पिवळी, टॅक्सी व सहा आसनी मिनीडोअर | साईसृष्टी नर्सरी समोर, राजीव गांधी चौक<br>Latitude- 18.381249<br>Longitude- 76.559239 | जुने विश्रामगृहाचे बंद इन-गेट पासून पुढे कंपाऊंड लगत, राजीव गांधी चौक, लातूर<br>Latitude- 18.380837<br>Longitude- 76.558825 |
| २ | वार्शी रोडवरुन लातूर कडे येणारी काळी-पिवळी, टॅक्सी व सहा आसनी मिनीडोअर | माही टायर्स, पीव्हिआर चौक, वार्शी रोड, लातूर<br>Latitude- 18.408150<br>Longitude- 76.538992 | पीव्हीआर टॉकीजचे दक्षिण बाजुस कंपाऊंड लगत सर्व्हिस रोडला, पीव्हीआर चौक, लातूर<br>Latitude- 18.408240<br>Longitude- 76.538937 |
| ३ | कळंब रोड | अभिजीत इडली सेंटर समोरील रोड, पीव्हीआर चौक, लातूर<br>Latitude- 18.410040<br>Longitude- 76.539822 | वुड टुल्स कंपनीचे कंपाऊंडलगत, सर्व्हिस रोड, पीव्हीआर चौक, लातूर<br>Latitude- 18.409831<br>Longitude- 76.539668 |
| ४ | अंबाजोगाई रोडवरुन लातूर कडे येणारी काळी-पिवळी, टॅक्सी व सहा आसनी मिनीडोअर | सार्वजनिक शौचालयाचे समोर, पाण्याची टाकीजवळ, नविन रेणापूर नाका, लातूर<br>Latitude- 18.418737<br>Longitude- 76.570894 | श्रीभारत हायटेक नर्सरी समोर, नविन रेणापूर नाका, लातूर<br>Latitude- 18.420054<br>Longitude- 76.571528 |
| ५ | नांदेड रोडवरुन लातूर कडे येणारी काळी-पिवळी, टॅक्सी व सहा आसनी मिनीडोअर | मैत्री लंच होम समोर, गरुड चौक, लातूर<br>Latitude- 18.410360<br>Longitude- 76.605050 | भारत पेट्रोलपंपाचे पुढील बाजुस भिमजी मेकजी पटेल यांचे सॉ मिलच्या कंपाऊंड लगत, गरुड चौक, लातूर<br>Latitude- 18.409777<br>Longitude- 76.604826 |
| ६ | बाभळगाव रोडवरुन शिरुर अनंतपाळकडून येणारी काळी-पिवळी, टॅक्सी व सहा आसनी मिनीडोअर | लातूर ग्रा पोलीस ठाणेचे पुढे, पांडे यांचे मोकळे जागेचा बाजुला, बाभळगाव रोड,लातूर<br>Latitude- 18.397475<br>Longitude- 76.60251 | प्रिन्स गार्डन रेस्टॉरंट समोर, बाभळगाव रोड, लातूर<br>Latitude- 18.397481<br>Longitude- 76.602439 |

**११) ॲटोरिक्षा थांबे :-**

लातूर शहर महानगरपालीका हददीत सन २०१४ च्या अधिसुचनेनुसार ५५ ॲटोथांबे निश्चित केलेले आहेत. त्यानंतर लातूर शहराच्या लोकसंख्येत व शहरीकरणात मोठया प्रमाणात वाढ व विस्तार झाला असल्याने नव्याने ॲटो थांब्यांची पाहणी करुन त्यामध्ये नंतर वाढ करण्यात येणार आहे.

Scanned with OKEN Scanner

१) गंजगोलाई परिसरात दैनंदिन बाजारासाठी येणाऱ्यांना मनपाची पार्किंगसाठी निश्चित केलेली गुळमार्केट जवळील व अण्णाभाऊ साठे चौकाचे बाजुस असलेली मोकळ्या जागांचा पार्किंगसाठी वापर करण्यात येत आहे.

२) मार्केट यार्ड खालील जनावरांचा बाजार : जनावरांचा बाजार हा नियोजित जागी बसेल रिंग रोड मार्गावर रहदारीस अडथळा होणार असलेले कोणतेही विक्रेते, हातगाडे किंवा इतर वाहने थांबणार नाहीत, बाजारात येणारे जनावर विक्रेते यांनी आपले वाहने व बाजारात खरेदीसाठी येणारी वाहने चारचाकी यांनी पार्किंग नेमुन देण्यात आलेल्या ठिकाणी करावी.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ पोटकलम १ (ब) अन्वये रहदारी विनीयम अधिकार अन्वये सदर बाबत जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सदर जाहिरनामा प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत उपरोक्त प्रस्तावातील नियमाचे संदर्भात ज्यांच्या हरकती/आक्षेप असल्यास त्यांनी योग्य त्या समर्थनिय पुराव्यासह स्वतः किंवा त्यांचे प्राधीकृत प्रतिनिधी मार्फत हरकती/आक्षेप सादर करावेत. विहीत तारखेनंतर प्राप्त होणा-या हरकती/आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. विहीत कालावधीत आलेल्या हरकती/ आक्षेपाची सुनावणी करुन निकाल लावुन अंतिम जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येईल.

सदर जाहिरनामा दिनांक १५.०४.२०२६ पासुन लागु करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण** :- लातूर.
**दिनांक** :- १४.०४.२०२६

अमोल

**अमोल श्री.तांबे** (भा.पो.से.)
**पोलीस अधीक्षक, लातूर.**

**प्रति :-**

1. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, यांना माहिती व विस्तृत प्रसिध्दी व पुढील कार्यवाहीसाठी.
2. मा.संपादक सो, दैनिक, -----------------------------/- वरील जाहिरनामा जनहितार्थ आपले लोकप्रिय दैनिक वृत्तपत्रातुन/ प्रसार माध्यमातुन प्रसिध्द होणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner